डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात.

REGISTERED No. B. 3434

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख २० फेब्रुवारी १९४६ अंक ८

लहान मुलांकरितां **आर्को** गोड —एरंडेल— वापरा

: लक्ष्मी एजन्सी :

मंगळवार पेठ, कोल्हापूर




'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें.

| | |
|---|---|
| अधिकृत भाण्डवल | विक्रीस काढलेलें व खपलेलें |
| रु. ५०,००,००० | रु. २५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. १२,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. २,७०,००० |

एकूण खेळतें भाण्डवल रु. १,५०,००,००० चे वर

★ बँकेच्या शेअर्सवरील डिव्हिडंडमध्यें क्रमशः वाढ होत आहे.

★ गतवर्षी शें. ४½ + ½ टक्के डिव्हिडंड देण्यांत आलें.

—ःशाखाः—

डेक्कन जिमखाना, (पुणें), खडकी, गिरगांव, मुंबई, जळगांव, नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव व फैजपूर ( पे–ऑफिस )

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग
मॅनेजर

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना–१९१७

फोन नं. ४८३ | तारेचा पत्ता "Cencobank" | पोस्टबॉक्स नं. ११

मुख्य कचेरीः–लक्ष्मीरोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—ः शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—ःबँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

# विविध माहिती

## आस्ट्रेलियाच्या निर्यात व्यापारवृद्धीची योजना

आस्ट्रेलिया १० लाख पौंड भांडवलाची एक कंपनी काढून तिच्यामार्फत आपल्या निर्यात व्यापाराची वृद्धि करणार आहे. ज्या ज्या देशांत माल निर्यात करावयाचा त्या त्या देशांत या कंपनीचे व्यापारी प्रतिनिधी रहातील.

## रशियांतील कापसाची वाढ

रशियानें रशिया हा जगांत सर्वात मोठा कापूस व कापसाचे जिन्नस उत्पन्न करणारा देश बनविणारी दशवार्षिक योजना आखली आहे.

## जयप्राप्तीनिमित्त काढलेलीं पोष्टाचीं तिकिटें

जानेवारी दोन तारखेपासून जयप्राप्तीनिमित्त काढलेल्या १॥ आणा व ३॥ आणेवाल्या तिकिटांप्रमाणें ९ पै व १२ आणेवालीं, जयनिदर्शक पोष्टाचीं तिकिटं ८ फेब्रुवारीपासून मिळूं लागलीं आहेत. हीं तिकिटें ३१ डिसेंबर १९४६ पर्यंत विकलीं जातील.

## १९४७ पर्यंत ब्रह्मी तांदूळ हिंदुस्थानास मिळणार नाहीं

'असोसिएटेड प्रेस ऑफ अमेरिका' या संस्थेला दिलेल्या मुलाखतींत मि. एम. ए. मास्टर यांनीं कलकत्त्यास असें सांगितलें कीं, हिंदुस्थानाला पुढील वर्षापर्यंत ब्रह्मी तांदूळ मिळण्याची आशा नाहीं.

## हिंदुस्थानांतील दुधदुभत्याची उत्पत्ती

हिंदुस्थानच्या दूधदुभत्याच्या उत्पादनासंबंधीं हिंदुस्थान सरकारला ज्यांनीं नुकताच आपला रिपोर्ट सादर केला त्या मि. आर. ए. पेपरआल यांनीं ससेक्स परगण्यांतील शेतकऱ्यांपुढें भाषण करितांना सांगितलें, कीं हिंदुस्थानला आपल्या देशांतील उरलेल्या दुधाचा पुरवठा आपण केल्यास बरें. कारण, त्या देशांतील मजुरांकडे पाहिल्यास असें स्पष्ट दिसून येतें कीं या लोकांना बालपणीं योग्य आहार मिळाला नाहीं. राष्ट्रीय दूधपुरवठ्याची योजना सिद्धीस गेल्यास या लोकांच्या प्रकृत्या सुधारतील.

## हिंदुस्थानातील चहाची निर्यात

मार्च १९४५ मध्यें केलेल्या अंदाजाप्रमाणें सरकारनें हिंदुस्थानांतून ३७,५५,००,००० पौंड चहा निर्यात करण्यास परवानगी दिली होती परंतु आतां पुन्हां केलेल्या अंदाजाबरहुकूम आणखी २,३०,००,००० पौंड चहा निर्यात करण्यास सरकारनें परवानगी दिली आहे. म्हणजे आतांपर्यंत जो चहा परदेशीं जात असे त्याच्या १०४ टक्के चहा परदेशीं जात आहे.

## हा घ्या अधिक फायदा !

बिलिमोरा येथील रायचंद फुलचंद नांवाच्या कापड व्यापाऱ्यानें एकवार कापडाला चार आणे जास्त घेतले म्हणून नवसारीच्या मॅजिस्ट्रेटनें त्याला ४,००० रुपये दंड केला !

## इंग्लंडमधील लोकसंख्या घटणार

युद्धसमाप्तीनंतर ब्रिटनची जननसंख्या पुन्हां घटूं लागली आहे. यांत जर सुधारणा झाली नाहीं, तर हल्लींची ४,६०,००,००० लोकसंख्या २०४५ सालीं १,४०,००,००० होईल असा तज्ञांचा अंदाज आहे.

## बंगलोरच्या अर्थशास्त्रज्ञाचा मृत्यु

म्हैसोर एकॉनॉमिक जर्नलचे संपादक रावबहादूर सी. हयवदनराव हे आपल्या ७८ व्या वर्षी बंगलोरला २७ जानेवारी १९४६ ला निवर्तले.

## मुंबई इलाख्यांतील शेतकी खातें

शेतकी खात्याची सध्या झालेली वाढ एका अधिकाऱ्याच्या आटोक्याबाहेर आहे असें सरकारच्या नजरेस आल्यावरून त्या खात्याचे चार विभाग करून त्या चारी विभागांवर मुख्य म्हणून हल्लींचे शेतकीखात्याचे डायरेक्टर सर विल्यम जेंकिन्स यांची अग्रिकल्चरल कमिशनर म्हणून नेमणूक करण्यांत आली आहे. या उपर (१) लँड इंप्रूव्हमेंट डिपार्टमेंट (२) अग्रिकल्चरल डिपार्टमेंट, (३) लाइव्हस्टाक डिपार्टमेंट व (४) मेक्यानिकल कल्टिव्हेशन डिपार्टमेंट असे ह्या खात्याचे चार विभाग होतील. या सुधारणेनुरूप अग्रिकल्चरल कमिशनर व डायरेक्टर ऑफ लँड इंप्रूव्हमेंट अशा दोन जागा सध्या एका वर्षासाठीं मंजूर करण्यांत आल्या आहेत. लाइव्हस्टाक एक्सपर्ट व मेक्यानिकल ट्रॅन्सपोर्ट इंजिनिअर या जागा आधीच मंजूर केलेल्या आहेत.

## अन्नपुरवठा वाढविण्याची अमेरिकेची खटपट

जगांतील अन्नपुरवठा कमी झाल्याकारणानें प्रेसिडेंट ट्रूमन यांनीं खालील नऊ गोष्टी करण्याचें योजिलें आहे:—

(१) अन्नपुरवठा, मुख्यतः रोटी, ह्याच्या वाढीकडे सरकारी सक्त नजर.

(२) दारू व बीर तयार करण्यासाठीं धान्य वापरण्यास बंदी.

(३) गव्हाच्या प्रत्येक बुशेलमागें ८० टक्के अधीक आट्याची उत्पत्ति आणि कणकेचें काळजीपूर्वक वाटप.

(४) शेतकी खात्याची धान्य, गिरण्या, भटारखाने यांच्यावर सक्त नजर.

(५) गहू व इतर धान्याच्या निर्यातीला प्रथम रेल्वे वाघिणी पुरविण्याची व्यवस्था.

(६) या निर्यातीवर शेतकी खात्याची सक्त नजर.

(७) चरबी, तेल व मांसाची अधिक पैदास करणें.

(८) युरोपला अन्न पाठविण्यासाठीं लष्करी व नाविक खात्यांतील रेफ्रिजरेटर्स देणें.

(९) हल्ली जनावरें व कोंबड्यांना घालण्यांत येणारें धान्य वांचवून माणसांना मिळवून देणें.

दारू व बीर तयार करण्यांत येण्यासाठी वापरण्यांत येणारा गहू माणसांना खाण्यासाठी राखण्यांत येईल. प्रेसिडेंट ट्रूमन म्हणाले, अमेरिकन मनुष्य ३३०० कॅलरी अन्न खातात तर युरोप खंडांतील १२,५०००००० लोक २,००० व कधीं कधीं १००० कॅलरी अन्नावर गुजराण करतात.

## साम्राज्य परिषदेसाठी हिंदी शास्त्रज्ञ

ब्रिटिश साम्राज्यांतील शास्त्रज्ञांच्या परिषदेसाठी १४ हिंदी शास्त्रज्ञांना बोलाविलें आहे. या चौदांत सात सरकारी नोकर व सात स्वतंत्र आहेत. ह्या शास्त्रज्ञांत सर सी. व्ही. रामन्, सर जे. सी. घोष, डॉक्टर मेघनाद साहा इत्यादि आहेत. लढाई चालू असतांना साम्राज्यांतील सर्व शास्त्रज्ञ लंडन व वॉशिंग्टन येथें युद्धोपयोगी शोध लावण्यांत गर्क होते. आतां ह्यांचा उपयोग संरक्षण व शांतता यांना उपयुक्त होईल असे शोध लावण्याकडे होईल.




पंढरीनाथ ब्रिलिअन्टाईन वापरा

सांड् प्रेग युटेरो
गरोदर स्त्री व गर्भ यांस पोषक
द. कृ. सांड् ब्रदर्स, चेंबूर, लिमीटेड. (चेंबूर, मुंबई)

पुणें चीफ एजंटस:—
मेसर्स श्री दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें.



# व्याजाचे उतरते दर व त्याचा विमा कंपन्यांवर परिणाम

व्याजाचा दर एकसारखा उतरत चालला आहे आणि दुसऱ्या महायुद्धानंतर तर तो फारच उतरला आहे व कराचा बोजा मात्र वाढत आहे, ह्यामुळें हिंदी विमा कंपन्यांची परिस्थिति जरा बिकट झाली आहे. ब्रिटिश कंपन्यांच्या मानानें तर ती फारच प्रतिकूल आहे. १९४५ च्या विमा वार्षिकांत ह्या प्रश्नाचा तपशीलवार विचार करण्यांत आलेला आहे. हिंदुस्थानांत विम्याचा प्रसार अद्याप फारसा झालेला नाहीं व त्यामुळें विम्याचें काम झपाट्यानें वाढत आहे. इंग्लंडमधील परिस्थिति तशी नाहीं. त्याकारणानें नव्या कामाचें एकूण चालू कामाशीं प्रमाण इंग्लंडमध्यें थोडें, तर हिंदुस्थानांत भारी आढळतें, खालील तक्ता पहा:—

वार्षिक नवीन कामाचें एकूण चालू कामाशीं प्रमाण

| वर्षे | हिंदी कंपन्या | ब्रिटिश कंपन्या |
|---|---|---|
| १९३३ | २२·६ | १०·१ |
| १९३४ | २३·९ | ११·१ |
| १९३५ | २२·५ | ११·६ |
| १९३६ | २१·७ | ११·८ |
| १९३७ | २०·८ | ११·७ |
| १९३८ | १९·६ | ११·७ |
| १९३९ | १६·४ | ८·४ |
| १९४० | १३·६ | ५·५ |
| १९४१ | १३·८ | ६·४ |
| १९४२ | १४·२ | ७·१ |
| १९४३ | २३·७ | ७·२ |

ह्याचा अर्थ असा कीं, इंग्लंडमधील कंपन्यांचे हातीं नव्यानें येणारा पैसा त्यांच्या एकूण जिंदगीच्या मानानें अल्प असतो. बहुतेक जिंदगी भारी व्याजाच्या दरानें त्यांनीं अगोदरच गुंतविलेली असते. हिंदी कंपन्यांचे बाबत परिस्थिति उलट आढळते. पूर्वीं चांगल्या दरानें गुंतविलेल्या जिंदगीचे मानानें नव्या कामाच्या हप्त्यांचा पैसा मोठ्या प्रमाणांत त्यांचे हातीं येतो व तो कमी व्याजानें गुंतवावा लागतो. १९३३ सालीं प्रमुख हिंदी कंपन्या व ब्रिटिश कंपन्या ह्यांचे एकूण फंड प्रत्येकी १०० होते असें मानलें, तर ते कसकसे वाढत गेले, हें खालील तक्ता दर्शवितो. १९३९ पासुन विशेषत: व्याजाचा दर उतरला; उलट तेव्हापासून हिंदी कंपन्यांचे फंड ब्रिटिश कंपन्यांच्या फंडांचे मानानें कसे शीघ्र गतीनें वाढले, हें तक्त्यावरून समजून येईल.

हिंदी व ब्रिटिश कंपन्यांच्या फंडांचे तुलनात्मक आकडे

१९३३ = १००

| वर्षे | हिंदी कंपन्या | ब्रिटिश कंपन्या |
|---|---|---|
| १९३३ | १००·० | १००·० |
| १९३४ | ११०·५ | १०४·३ |
| १९३५ | १२२·१ | १०८·४ |
| १९३६ | १३८·७ | ११३·६ |
| १९३७ | १५५·२ | ११९·१ |
| १९३८ | १७३·४ | १२४·० |
| १९३९ | १९०·५ | १२६·४ |
| १९४० | २११·० | १२८·० |
| १९४१ | २३२·७ | १३१·३ |
| १९४२ | २५६·९ | १३५·६ |
| १९४३ | २८५·१ | १४०·१ |

दुसऱ्या महायुद्धाचे प्रारंभापासून ब्रिटिश कंपन्यांचें नवें काम घटलें आहे. १९३८ चे मानानें १९४२ सालीं त्यांस ६४·२%, १९४३ सालीं ६५·२% व १९४४ सालीं ७५·९% काम मिळालें. उतरत्या व्याजाच्या काळांत नव्यानें मिळणाऱ्या रकमा किफायतशीर गुंतविण्याची विवंचना थोडीफार त्यामुळें दूर झाली व एकूण रकमांवर त्यांस पडणारें व्याज फारसें खालीं गेलें नाहीं. हिंदी विमा कंपन्यांच्या कामांत उलट वाढ झाली, ती नेमकी उतरत्या व्याजाच्या काळांत! १९३३ = १०० असें मानलें तर हिंदी व ब्रिटिश कंपन्यांना दरसाल नवें काम कसें मिळत गेलें, हें खालील तक्ता दर्शवितो:—

वार्षिक नवें काम

| वर्ष | प्रमुख हिंदी कंपन्या | ब्रिटिश कंपन्या |
|---|---|---|
| १९३३ | १०० | १०० |
| १९३४ | ११३·९ | ११३·५ |
| १९३५ | १२७·४ | १२२·० |
| १९३६ | १३८·३ | १३३·२ |
| १९३७ | १४७·५ | १४०·७ |
| १९३८ | १५२·८ | १३६·५ |
| १९३९ | १३९·६ | १०५·० |
| १९४० | १२२·९ | ६८·३ |
| १९४१ | १३०·३ | ७९·८ |
| १९४२ | १४१·१ | ८७·७ |
| १९४३ | २४८·० | ८९·० |

### व्याजाचा उतरता दर व कराचा बोजा

ह्या सर्वांचा परिणाम ब्रिटिश कंपन्यांच्या मानानें हिंदी कंपन्यांस सुटणारा व्याजाचा दर फार कमी होण्यांत झाला. सर्वसाधारण व्याजाचे दर खाली राखण्यामुळें हिंदुस्थानचा काय फायदा आहे, हा प्रश्न येथें विचारांत न घेतां विमाव्यवसायापुरतेंच पाहिलें तर त्याचा त्यांत निश्चित तोटाच दिसतो. व्याजाचा दर उतरला कीं हप्त्यांचे दर वाढविणें क्रमप्राप्तच होतें. त्यांतच भारी कराची भर पडली, म्हणजे परिस्थिति अधिक बिकट होते. हप्त्यांच्या रकमेचा मोठा भाग विमेदारास अपमृत्यु आल्यास विम्याची रकम तयार ठेवण्यांत खर्च होतो. ही गोष्ट सामान्य विमेदारांस समजत नाहीं. ते पॉलिसीची रकम हातीं येते वेळीं त्यांस एकूण किती व्याज सुटलें, त्याचाच विचार करतात. साहजिकच तें अल्प असतें. विमा पॉलिसीवर चांगलें व्याज सुटलें नाहीं, तर विम्याची लोकप्रियता कमी होणें स्वाभाविक होतें. विमेदारांचें बोनसकडे लक्ष असतें व विमा पॉलिसी मिळवितांना बोनसच्या तुलनेचा उपयोग करून घेण्यांत येतो. व्याजाचा दर कमी व कराचा बोजा जास्त अशा परिस्थितींत कंपन्या मोठालें बोनस देणार कोठून? ब्रिटिश कंपन्यांनीं मागील पांच-सात वर्षींचें साचलेलें बोनस जाहीर करण्यास प्रारंभ केला आहे, त्याचा हिंदी विमा व्यवसायावर परिणाम होणार कीं काय अशी भीति वाटते. हिंदी कंपन्यांस द्यावा लागणारा कमाल कर रुपयांत ६३ पै असा ठरविण्यांत आला आहे, तो कमी करण्यांत यावा अशी सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सची शिफारस आहे. हिंदी विमा व्यवसाय किफायतशीर होणें त्यासेरीज कठीण आहे. १९४३

च्या विमा वार्षिकांतील आपल्या रिपोर्टांत त्यांनीं ३½% पेक्षा जास्त व्याज सुटण्याची अपेक्षा कंपन्यांनीं करूं नये असें म्हटलें होतें. १९४४ च्या वार्षिकांत ३% किंवा त्यापेक्षाहि जरा कमीच व्याज धरणें योग्य असें सुचविलें होतें व १९४५ च्या वार्षिकांत तर ३% पेक्षा खालीं जाणें अपरिहार्य असल्याचें सांगण्यांत आलें आहे. तीन वर्षांतील परिस्थितींत इतका बदल पडला आहे. नवीन काम वाढत आहे, त्याची गुंतवण चांगल्या व्याजानें होणें अशक्यप्राय आहे. हप्त्यांतील वाढीसहि मर्यादा आहे. तेव्हां कंपन्यांस द्यावा लागणारा कर कमी होण्याबाबत मागणी करण्यावांचून गत्यंतर नाहीं. १९४५ च्या आपल्या रिपोर्टांत सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सनें कंपन्यांवर ताशेरे न मारतां सरकारासच कांहीं सूचना केल्या आहेत, त्याचा अर्थ स्पष्ट आहे.

भारत इं. बँक, लि.,
भागीदारांस ४½% करमाफ मिळणार

वरील बँकेस १९४५ सालीं १७,९१७ रु. निवळ नफा झाला. त्यांत मागील शिलकी नफा मिळविला, म्हणजे १८,४०८ रुपये होतात. रिझर्व्ह फंडांत ३,६०० रुपये, टाकून व ३,००० रुपयांची इनकमटॅक्सची तरतूद करून, क्यु. रि. प्रे. भागांस ६% व ऑर्डिनरी भागांस ४% ( करमाफ ) डिव्हिडंड व ½% (करमाफ) बोनस देण्याची शिफारस डायरेक्टरांनीं केली आहे. नोकरवर्गास बोनस देण्यासाठी १,९०१ रुपये लागतील व १,३८८ रुपये पुढील हिशेबांत ओढण्यांत येतील. अहवालाचे वर्षी बँकेनें ओझर ( तांबट ) येथें एक शाखा उघडली, तिच्या स्थापनेचा सर्व खर्च खर्चांत टाकलेला आहे. बँकेनें १९४५ सालीं आपलें वसूल भांडवल १,६९,३८५ रुपयांवरून २,२९,८९५ रुपयांवर नेलें. खेळतें भांडवल २५ लक्षांचें सुमारें ४० लाखांवर आलें आहे. अशा रीतीनें, सर्व बाजूंनीं बँकेची प्रगति झाली आहे.


भांडवल सुरक्षितपणें व किफायतशीरपणें गुंतविण्याचें
—आदर्श ठिकाण—

चितळे ॲग्रिकल्चरल प्रॉडक्ट्स् लिमिटेड

मॅनेजिंग एजंटस:—चितळे ब्रदर्स
रजिस्टर्ड ऑफिस—वेस्टर्न इंडिया हाऊस, सर फेरोजशहा मेथा रोड, कोट, मुंबई.
वाढत्या धंद्यासाठी कंपनी खालील दरानें ठेवी स्वीकारते.

| ठेवी— | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मुदत वर्षें | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| व्याजाचा दर | ४ | ४॥ | ५ | ५॥ | ६ |

अधिक माहितीसाठी आजच वरील पत्त्यावर लिहा.

—: साठे बिस्किटें :—

श्रूसबरी, ऑरेंज, फॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसही पाठवूं शकूं.

—साठे बिस्किट कं., पुणें २

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच

खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-treaders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स
★ रबरी हातमोजे
★ रबरी वॉशर्स
★ छापखान्यांचे रोलर्स
★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.


X·2m,N35
H6

# स्फुट विचार

## प्रवासी आकर्षण्याचा ब्रिटिश धंदा

इतर देशांतील लोक आपल्या देशांत आकर्षून त्यांना तेथें पैसे खर्च करण्या लावणें हा एक महत्त्वाचा धंदा आहे. माल निर्गत करून त्याचे पैसे आणविणें आणि परदेशांतील लोकच पैसे खर्चण्या साठी स्वदेशांत आणणें, ह्या दोन्हींत वस्तुतः फरक नाहीं. फ्रान्स, स्वित्सरलंड, वगैरे देश प्रवासी आकर्षण्याचा धंदा मोठ्या प्रमाणावर करीत आलेले आहेत. इंग्लंडमध्यें हिंदी राजे रजवाडे, व्यापारी किंवा विद्यार्थी गेले, म्हणजे हिंदी पैसा तेथें खर्च करतात. त्याचा अर्थ, तितक्या किंमतीच्या मालाची हिंदुस्थानांत प्रत्यक्ष आयात झाली नाहीं, तरी स्वतः तेथें जाऊन हिंदी पैशाचे मोबदल्यांत माल खरेदी करतात किंवा जिनसा वापरतात. इंग्लंडमध्यें परदेशी प्रवासी आकर्षण्यासाठी ट्रॅव्हल असोसिएशन ऑफ ग्रेट ब्रिटन व आयर्लंड ही संस्था मोठ्या योजना आखीत आहे. जगांतील १५,००० सिनेमागृहांतून ब्रिटिश सृष्टिवैभव व ऐतिहासिक स्थळें हीं खुलवून दाखविणारे रंगीत बोलपट प्रकाशित करण्यांत येतील. वेगवेगळ्या भाषांतून लिहिलेलीं परिचय पुस्तकें जगभर धाडलीं जातील. नभोवाणीवरून भाषणें, परदेशांतील वृत्तपत्रांत लेख व बातम्या, परदेशांत खपणाऱ्या मासिकांत जाहिराती, इत्यादि प्रचाराचीं साधनें उपयोगांत आणलीं जातील. अशा रीतीनें, परदेशांतील लोकांना इंग्लंडकडे आकर्षून घेऊन, त्यांना तेथें पैसे खर्चण्यास उद्युक्त करण्याचा हा प्रचंड प्रयत्न आहे. ज्या देशांवर इंग्लंडचें प्रभुत्व आहे, अशा हिंदुस्थानासारख्या देशांत ह्या प्रचारास स्थानिक सरकारी प्रोत्साहनहि मिळेल, हें उघड आहे. हिंदी विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर शिक्षणासाठी बाहेर धाडण्यांत येत आहेत, त्यांतील प्रत्यक्ष शिक्षणाची आवश्यकता किती आहे व तें शिक्षण हिंदुस्थानांत किंवा इतरत्र मिळणें अशक्य आहे काय, इत्यादि प्रश्न ह्यासंबंधांत उपस्थित होतात. इंग्लंडहून परत आलेले विद्यार्थी ब्रिटिश मालाच्या आयातीचें अप्रत्यक्ष हस्तक बनतात, हाहि एक मुद्दा आहे. परदेशगमनाचें महत्त्व निर्विवाद आहे, परंतु त्यापासून होणाऱ्या राष्ट्रीय नफा–नुकसानीचा ताळेबंद पहाणें अगत्याचें आहे.

---

## हिंदी संस्थानांच्या औद्योगीकरणास इंग्रजांचें सहाय

हिंदी संस्थानांच्या औद्योगिक शिष्टमंडळानें ग्रेट ब्रिटन, अमेरिका व कॅनडा ह्या देशांस नुकतीच भेट दिली. त्या शिष्टमंडळाचे एक सभासद, ग्वालेर संस्थानाचे व्यापारमंत्रि सरदार के. डी. महाडिक, ह्यांनीं आपल्या मुलाखतींत आपले अनुभव सांगितले. आणखी एक वर्ष तरी इंग्लंडकडून फारशी यंत्रसामुग्री मिळण्याचा संभव नाहीं, अमेरिकेकडे ज्या अनेक देशांनीं यंत्रसामुग्रीची मागणी केली आहे त्यांच्या रांगेत हिंदुस्थानाचा अनुक्रम शेवटाचे बाजूस आहे, हुंडणावळीच्या अडचणमुळें अमेरिकेंत माल खरेदी करणें अवघड आहे; तेव्हां कालांतरानें मिळावयाच्या मालाच्या ऑर्डरी आजच देऊन ठेवणें इष्ट होईल, असें मत त्यांनीं व्यक्त केलें. युद्ध काळांत हिंदी संस्थानांनीं औद्योगीकरणाच्या योजना आखून तयार ठेवल्या असल्याकारणानें, तेथें औद्योगिक प्रगति घडवून आणणें सोपें जाईल, असें ते म्हणाले. ब्रिटिश कारखानदार हिंदी संस्थानांकडून मोठ्या ऑर्डरींची अपेक्षा करीत आहेत. सुमारें ६०० कोटि रु यांची यंत्रसामुग्री संस्थानांस लागेल, त्याच्या ऑर्डरी अमेरिका, कॅनडा व ग्रेट ब्रिटन ह्यांचेमध्यें वाटून दिल्या जातील. संस्थानी शिष्टमंडळानें कॅनडा व अमेरिका इकडे जातांना वाटेंत इंग्लंडमध्यें पुष्कळ ऑर्डरी देऊन ठेवल्या आहेत. हिंदी संस्थानांच्या औद्योगीकरणाच्या योजनांसाठी ब्रिटिश कारखानदारांनीं तांत्रिक सल्ला द्यावा व संस्थानांतील यंत्रविशारदांस शिक्षण द्यावें, अशी खटपट शिष्टमंडळानें केली आहे. चेंबर ऑफ प्रिन्सेसच्या चॅन्सलरच्या सेक्रेटारिएटचे डायरेक्टर व ऑल इंडिया स्टेट्स पोस्ट वॉर रीकन्स्ट्रक्शन कमिटीचे सेक्रेटरी मि. मिर महमद, ह्यांनीं शिष्टमंडळाच्या कामाची माहिती लंडनमध्यें दिली. हिंदुस्थान व इंग्लंड ह्यांचेमधील दीर्घकालीन नातें लक्षांत घेऊन, ऑर्डरींचे बाबींत इंग्लंडलाच प्राधान्य दिलें जाईल, असें ते म्हणाले. शिष्टमंडळाचें इंग्लंड, अमेरिका व कॅनडा ह्या देशांत झालेल्या स्वागताचा त्यांनीं उल्लेख केला. त्या स्वागताचें रहस्य उघड आहे.

---

## हिंदुस्थानाची संयुक्त राष्ट्रांकडे अन्नाची मागणी

अन्नाच्या तुटवड्याचा प्रश्न एकाद्या प्रांतापुरता किंवा देशापुरता मर्यादित राहिला नसून, तो आंतरराष्ट्रीय झाला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या जनरल असेंब्लीनें, अन्नाच्या जागतिक तुटवड्यावर उपाययोजना तातडीनें करण्याची आवश्यकता सर्व राष्ट्रांचे मनावर बिंबविणारा एक ठराव मंजूर केला आहे. हिंदुस्थानतर्फे भाषण करतांना सर रामस्वामी मुदलियार ह्यांनीं हिंदी परिस्थितीच्या भीषणतेचें यथातथ्य चित्र रेखाटलें. १९४२–४३ च्या दुष्काळांत हिंदुस्थानामध्यें २० लक्ष लोक उपासमारीनें मरण पावले, परंतु हिंदुस्थानांतील एकहि परदेशीय मनुष्यास त्या भयंकर काळांतहि उपाशी रहाण्याची पाळी येऊं देण्यांत आली नाहीं, असें सांगून "पाहुणचाराची प्रथा चालू ठेवण्याचा हा चमत्कारिक प्रकारच झाला म्हणावयाचा" असें ते उद्गारले. इकडे हिंदी प्रजा उपासमारीनें मरण पावत असतांना हिंदुस्थानानें रशिया, आफ्रिका, इत्यादि देशांकडे चहा, साखर, कापड इत्यादि माल पाठविला, तेव्हां आतां हिंदुस्थानची गरज भागविण्याची मी रशिया व इतर राष्ट्रें ह्यांस विनंति करतों, असें म्हणून त्यांनीं हिंदुस्थानातर्फे मदतीची याचना केली. युद्धप्रयत्नासाठी हिंदी लोकांनीं केलेल्या कमालीच्या स्वार्थत्यागाचें चीज करण्यांत आलें पाहिजे, असें त्यांच्या विचारसरणीचें सार आहे. जागतिक तुटवड्याचे वेळीं हिंदुस्थानास आतां किती धान्य आयात करतां येईल, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्याचप्रमाणें, आयात होणारें व हिंदुस्थानांत पिकणारें धान्य किती कार्यक्षमतेनें व समान पायावर गोळा करून वाटलें जातें, हीहि बाब महत्त्वाची आहे. कांहीं किमान अन्न प्रत्येकाच्या वाट्यास आलेंच पाहिजे, ही आरोग्याची प्राथमिक बाजूहि दृष्टीआड होऊन भागणार नाहीं. हिंदुस्थान सरकारनें इंग्लंडकडे पाठविलेल्या शिष्टमंडळाचे कार्याकडे लोकांचें लक्ष लागून राहील, हें उघड आहे.

---

## १९४६ च्या कॅलेंडरांची साभार पोंच

१ खादी मंदिर, २६२ बुधवार, पुणें
२ दि ट्रस्ट ऑफ इंडिया अॅशुअरन्स कं. लि., पुणें
३ एंपायर इंजिनिअरिंग सिंडिकेट, पुणें
४ आयुर्वेद रस शाळा पुणें लि. पुणें, ४
५ आयुर्वेदीय अर्कशाळा लि., सातारा

---

"Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India Rule 94 A. by an order of which a complete copy is open to public inspection at the Head Office of the Company. It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them."

कंपनीच्या स्टेटमेंट इन लिओ ऑफ प्रॉस्पेक्टसची प्रत मुंबईच्या रजिस्ट्रार ऑफ कंपनीजकडे नोंदविण्यांत आली आहे.)

हें प्रॉस्पेक्टस् नसून केवळ प्रसिद्धीपत्रक आहे

कै. न्या. मा. गो. रानडे यांच्या स्मरणार्थ स्थापन झालेली

# मागोरा केमिकल कंपनी लि., पुणें २

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

(१) श्री. ए. व्ही. रानडे (चेअरमन) मेसर्स व्ही. आर. रानडे अँण्ड सन्स लि., यांच्यापैकीं; व्हाइस–चेअरमन, क्लब ऑफ महाराष्ट्र लि., डायरेक्टर, नवयुग चित्रपट लि., पुणें ४.

(२) श्रीमंत सरदार खंडेराव रामराव ऊर्फ बापूसाहेब विंचूरकर, बी. ए., एलएल. बी. (व्हाइस–चेअरमन) फर्स्ट क्लास सरदार ऑफ दि. डेक्कन; डायरेक्टर (एक्स आफिशिओ) कृष्णा शुगर मिल्स लि., किन्नूर; पार्टनर, मेसर्स विंचूरकर अँण्ड को. मॅनेजिंग एजंट्स, कृष्णा शुगर मिल्स लि., किन्नूर; चेअरमन, गोवर्धन डे. फा. लि., पुणें; चेअरमन, लक्ष्मी टेक्स्टाइल मिल्स लि., भोर, सदाशिव पेठ, पुणें २.

(३) संगीत कलानिधि मास्टर कृष्णराव गणेश फुलंब्रीकर, सुप्रसिद्ध गायक व संगीत-दिग्दर्शक, टिळकवाडी, पुणें २.

(४) श्री. वामन काशिनाथ जोगळेकर, मेसर्स लक्ष्मण भार्गव जोगळेकर, चोळखणआळी, यांच्यापैकीं; बुधवार पेठ, पुणें २.

(५) श्री. एन. जी. रानडे, कॉंट्रॅक्टर व व्यापारी, भांडारकर इन्स्टिट्यूट रोड, पुणें ४.

(६) श्रीमंत सरदार गोविंदराव बळवंतरावशास्त्री ऊर्फ बाजीसाहेब पटवर्धन, बडोदें; फर्स्टक्लास सरदार ऑफ दि डेक्कन; डायरेक्टर, चितळे ॲग्रिकल्चरल प्रॉडक्ट्स, मुंबई; पेपर अँण्ड पल्प कन्व्हर्शन्स लि., पुणें; चित्तपावन उद्योगनिधिमंडळ लि., पुणें.

(७) प्रो. वी. डी. सट्टीगिरी, एम्. ए., एलएल. बी., प्रोफेसर, सर परशुरामभाऊ कॉलेज, पुणें; डायरेक्टर, नवयुग चित्रपट लि., पुणें; चेअरमन, महाराष्ट्र टेक्स्टाइल लि., भोर.

(८) श्री. हरि केशव जोशी, बी. एससी. व्यापारी, डायरेक्टर हंस पिक्चर्स लि., मॅनेजिंग एजंट्स टू नवयुग चित्रपट लि. पुणें; टिळकवाडी, पुणें २.

(९) डॉ. एन. एन. गोडबोले, एम्. ए., बी. एससी. पीएच. डी. (बर्लिन), बनारस हिंदु युनिव्हर्सिटी बनारस, (एक्स–ऑफिशिओ).

(१०) श्री. गोविंद महादेव गोळे, बी. एससी., केमिस्ट, चांगदेव शुगर-मिल्स लि., पुणतांबें; ) (एक्स ऑफिशिओ).

(११) श्री. महादेव वासुदेव गोळे, डायरेक्टर, दि न्यू प्रॉव्हिडंट इन्शुअरन्स कंपनी लि., पुणें; सदाशिव पेठ, पुणें २, (एक्स–ऑफिशिओ).

(१२) श्री. राजाराम यशवंत रानडे, बी. ए., पार्टनर, मेसर्स आर. वाय. रानडे अँण्ड को., मॅनेजिंग एजंट्स, टू मागोरा केमिकल कंपनी लि., पुणें; (एक्स–ऑफिशिओ).

**अधिकृत भांडवल**—कंपनीचें अधिकृत भांडवल रुपये दहा लाखांचें असून हें भांडवल रुपये सहा लाखांचे आर्डिनरी शेअर्स (सहा हजार) व रुपये चार लाखांचे पांच टक्के व्याजाचें नॉन्क्युमिलेटिव्ह टॅक्स फ्री प्रेफरन्स शेअर्स (चार हजार) दोन्ही तऱ्हेचे शेअर्स प्रत्येकीं रुपये शंभर याप्रमाणें विभागलें आहे. हें सर्व भांडवल १२ महिन्यांच्या आंत विकण्याची हिंदुस्थान सरकारनें परवानगी दिलेली आहे.

**विक्रीस काढलेलें भांडवल**—डायरेक्टर्सनीं रुपये तीन लाखांचे तीन हजार आर्डिनरी शेअर्स व दोन लाखांचे दोन हजार प्रेफरन्स शेअर्स विक्रीस काढले आहेत.

**विकलें गेलेलें भांडवल**—कंपनी प्रायव्हेट लिमिटेड असतांना तिचें भांडवल रुपये दोन लाख होतें तेव्हां रुपये साडे बावन हजारांचे आर्डिनरी शेअर्स विकले गेले आहेत.

**शेअर विक्री**—प्रत्येक शेअरमागें अर्जासोबत रुपये तीस, प्रत्येक शेअरमागें अर्जमंजुरीनंतर रुपये तीस, बाकीची राहिलेली रुपये चाळीस ही रक्कम अर्जमंजुरीनंतर जरूर तेव्हां व तसें तीन महिन्यांपेक्षां कमी नाहीं अशा अंतरानें रुपये वीसच्या हप्त्यानें मागविली जाईल.

**मॅनेजिंग एजंट्स्.**
मेसर्स आर. वाय. रानडे अँण्ड को. ... पुणें २.

**ऑडिटर**
श्री. जी. डी. आपटे, बी. ए., जी. डी. ए., रजिस्टर्ड अकाऊन्टन्ट अँण्ड ऑडिटर, किताब बिल्डिंग, पुणें २.

बँकर्स : (१) दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., पुणें. (२) दि न्यू सिटीझन बँक ऑफ इंडिया लि., मुंबई.
(३) दि पुना सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें.

**कंपनीचा पूर्वेतिहास**—ही कंपनी कै. न्या. मा. गो. रानडे यांच्या स्मरणार्थ त्यांच्या शेमराव्या जन्मदिवशीं म्हणजे ता. १८ जानेवारी १९४२ मध्यें रेडियंट केमिकल कंपनी या नांवानें रा. रा. य. रानडे यांनीं स्थापन केली. ता. २१ जून १९४३ रोजीं रेडियंट कंपनीचें रूपांतर 'मागोरा केमिकल कंपनी लि.,' असें होऊन ती रुपये दोन लाख भांडवलाची प्रायव्हेट लिमिटेड कंपनी म्हणून रजिस्टर करण्यांत आली. तयार माल, मशिनरी, कच्चा माल, फॉर्म्युले इ. ची किंमत रुपये अठरा हजार होत होती, परंतु रा. रानडे

### तांदळाचा दुष्काळ कां ?

तांदळाचें चालू मोसमांतील जागतिक पीक गेल्या मोसमांतील पिकाच्या १०% कमी व युद्धपूर्व पिकाच्या १५% ते २०% कमी आहे. जगांतील एकूण पिकाच्या ९५% पीक आशिया खंडांत होतें. ब्रह्मदेश, सयाम, फ्रेंच इंडोचायना, येथून होणाऱ्या नेहमींच्या निर्गतीच्या १५% ते २०% इतकीच तांदळाची निर्गत १९४६ मध्यें होऊं शकेल. चीनमधील १९४५ सालांतील पीक युद्धापूर्वीच्या मानानें १८% कमी आहे. सिलोनमधील पिकावर अवर्षणाचा परिणाम झाला आहे. उत्तर अमेरिका व दक्षिण अमेरिका ह्यांतील पीक मात्र वाढलें आहे. आफ्रिकेंतील उत्पादनहि ज्यास्त झालें आहे.

### हातकंदील, कोको, चॉकलेट, इत्यादि धंद्यांस संरक्षण?

टारिफ बोर्डाकडे संरक्षणासाठी कांहीं हिंदी उद्योगधंद्यांचें अर्ज सोपविण्यांत आले आहेत, त्यांत आणखी कांहीं उद्योगधंद्याच्या अर्जांची भर टाकण्यांत येणार आहे. हातकंदील, कोको, पावडर व चॉकलेट इत्यादि धंद्यांचे अर्ज त्यांत आहेत.

### अमेरिकेचें १९४७ चें अंदाजपत्रक

१९४७ सालासाठीं ३५ अब्ज कोटि डॉलर्सचें बजेट मांडतांना प्रेसिडेंट ट्रूमन म्हणाले, "आपणांला पुढेंच सरकलें पाहिजे. आतां परत फिरतां येणार नाहीं." १९३० नंतर १९४७ च्या या बजेटांतच प्रथम राष्ट्रीय कर्जाची वाढ होत नाहीं.

### सिमेंटच्या नवीन कारखान्यांची योजना

असोसिएटेड सिमेंट कंपन्या व डालमिया सिमेंट कंपन्या यांना वगळून इतर ठिकाणांहून सरकारच्या युद्धोत्तर योजनाखात्यानें सिमेंटचे कारखाने काढण्याविषयीं उत्सुक असणाऱ्या कंपन्यांचे अर्ज मागविले होते, या अर्जांचा विचार करून सरकारनें पुढील कंपन्यांना सिमेंट कारखाने काढण्यास परवानगी दिली आहे. (१) आसाम बेंगाल सिमेंट कंपनी, (२) मायसोर आयर्न व स्टील वर्क्स. (३) आंध्र सिमेंट कंपनी, (४) इंडिया सिमेंट, (५) नॅशनल सिमेंट व (६) पंजाब मिनरल कंपनी. याखेरीज खालील संस्थानांतून कारखाने स्थापण्यास परवानगी देण्यांत आली आहे. (१) सिरमूर (२) गंगपूर (४) भोपाल व (४) टेहरी गरवाल.


**हा प्रॉस्पेक्टस नसून केवळ प्रसिद्धीपत्रक आहे**

"Consent of the Central Government has been obtained to this issue of capital under Defence of India Rule 94—A by an order of which a complete copy is open to public inspection at the head office of the Company and with the Underwriters."

२० फेब्रुवारी १९४६ रोजीं अर्ज स्वीकारण्यास प्रारंभ होईल व २५ फेब्रुवारी १९४६ रोजीं किंवा त्यापूर्वी, डायरेक्टर ठरवितील त्याप्रमाणें, अर्ज स्वीकारणें बंद केलें जाईल.

## नाणेघाट फ्युनिक्युलर ट्राम्वे ॲण्ड ट्रान्सपोर्ट कंपनी लिमिटेड

**संचालक मंडळ**

१ श्री. रामचंद्र गोविंद सुळे,
बी. ए., एल. सी. ई., एम. आय. ई., सी. आय. ई.
रिटायर्ड सुपरिंटेंडिंग एंजिनियर, पी. डब्ल्यु. डी. ( चेअरमन )

२ श्री. श्रीपाद गोविंद मराठे,
बी. ई. ( सिव्हिल ), एम. आय. ई. (इंडिया)

३ श्री. गंगाधर विष्णु पुराणिक,
गव्हर्निंग डायरेक्टर, श्रीधूतपापेश्वर पनवेल लि.

४ श्री. धोंडो कृष्ण साठे,
बी. ए., बी. एससी.,
चेअरमन, बँक ऑफ महाराष्ट्र लि.

५ श्री. वामन पुंडलिक वर्दे,
बी. कॉम.,
प्रोप्रा. आर. आर. नाबर आणि कं. मुंबई.

६ श्री. शन्तनु लक्ष्मण किर्लोस्कर,
बी. एससी., ए. एम. आय. ई.
डेप्युटी जनरल मॅनेजर, किर्लोस्कर ब्रदर्स, लि.

७ श्री. वासुदेव रामचंद्र जोशी,
एल. सी. ई.
मॅनेजिंग डायरेक्टर, डेक्कन एंजिनीअर्स लि.

अंडर रायटर्स : आर. आर. नाबर आणि कंपनी, मुंबई

| मॅनेजिंग एजंटस : | रजिस्टर्ड ऑफिस : | सेक्रेटरी : |
|---|---|---|
| डेक्कन एंजिनिअर्स लि. | ३८, डेक्कन जिमखाना, पुणें ४. | श्री. आ. ना. नारळकर. |

| अधिकृत भांडवल रु. २५ लाख | विक्रीस काढलेलें भांडवल रु. १० लाख |
|---|---|
| २०,००० ऑर्डिनरी शेअर्स प्रत्येकीं रु. १०० आणि | ८,००० ऑर्डिनरी शेअर्स प्रत्येकीं रु. १०० आणि |
| २०,००० डिफर्ड शेअर्स प्रत्येकीं रु. २५ | ८,००० डिफर्ड शेअर्स प्रत्येकीं रु. २५. |

**—योजना—**

नाणे घाटांत फ्युनिक्युलर ट्राम्वे घालून जुन्नर भाग मुंबईला जोडणारा व जनतेच्या दृष्टीनें अतिशय उपयुक्त असा एक सरळ व जवळचा रस्ता तयार करण्याची कंपनीची योजना आहे. फ्युनिक्युलर ट्राम्वेमुळें मालानें व माणसांनीं भरलेल्या मोटार गाड्या व इतर वाहनें जशीच्या तशी खालून घाट माथ्यावर व वरून घाटाचे पायथ्याशीं आणणें शक्य होणार आहे. नाणेघाट समुद्रसपाटीपासून २६०० फूट उंच आहे व तेथील हवा मोठी निरोगी आणि उत्साहवर्धक आहे. यामुळें नाणेघाट येथें एक थंड हवेचें ठिकाण नव्यानें वसवतां येणें शक्य आहे. तेथील कंपनीच्या धरणांतून अवश्य तो पाणीपुरवठा आणि विद्युतपुरवठा करतां येणार आहे. येथें एक गांव वसवावयाचें व पाणी, विद्युत, क्रीडांगणें, बागा आणि इतर सुखसोईंची व्यवस्था करून एक नमुनेदार थंड हवेचें ठिकाण या ठिकाणीं बनविण्याची कंपनीची इच्छा आहे. यामुळें फ्युनिक्युलर ट्राम्वे वरील वहातूक पुष्कळ वाढेल यांत संशय नाहीं.

**शेअर अर्ज व प्रॉस्पेक्टस ह्यांसाठीं कंपनीकडे किंवा अंडररायटर्सकडे लिहावे.**

# औद्योगीकरणास इंजिनिअर्स हातभार कसा लावूं शकतील ?

इंजिनिअर्सनीं व्यापक राष्ट्रीय वृत्तीनें आपल्या व्यवसायाकडे पाहिलें पाहिजे, परदेशी मालाची आयात वाढविण्यास सहाय करणारे केवळ हस्तक त्यांनीं बनतां कामा नये, यंत्रसामुग्रीच्या उपयोगाचा देशास अधिकांत अधिक फायदा कसा होईल ह्याकडे त्यांनीं लक्ष दिलें पाहिजे, यांत्रिक गोष्टींकडे पहातांना केवळ तांत्रिक दृष्टि उपयोगी नाहीं तर व्यापक राष्ट्रीय आर्थिक बाजूहि लक्षांत घेणें जरूर आहे, वगैरे विचार आपल्या व्यवसाय बंधूंचे पुढें मांडण्याची संधि इंजिनिअर्सच्या संघटनेंत उत्साहानें भाग घेणारे राष्ट्रीय वृत्तीचे इंजिनिअर व कॉन्ट्रॅक्टर श्री. सी. बा. जोशी हे कधींही वाया जाऊं देत नाहींत. श्री. जोशी ह्यांनीं स्वतः कार्यक्षमता व परिश्रम ह्यांचेमुळें इंजिनिअर्सच्या व्यवसायांत मानाचें स्थान प्राप्त करून घेतलेलें आहे. त्यामुळें केवळ विलायती पदवीच्या किंवा सरकारी नोकरीच्या भांडवलावर उत्कर्ष पावलेल्या इंजिनिअर्सना त्यांचे निर्भीड विचार अप्रिय वाटतात, परंतु त्या विचारांकडे दुर्लक्ष करून भागत नाहीं. परदेशी पदव्यांचें स्तोम कसें माजलें आहे आणि यापुढें विनाकारण विलायतेंत शिक्षण घेण्याची प्रवृत्ति कशी वाढणार आहे, ह्याचें विवेचन गेल्या वर्षी मेकॅनिकल इंजिनिअर्स असोसिएशनच्या रौप्यज्युबिली अधिवेशनांत त्यांनीं केलें होतें.

इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअर्सचें रौप्यअधिवेशन कलकत्ता येथें नुकतेंच भरलें होतें, त्यामध्यें श्री. जोशी ह्यांनीं "इंजिनिअरिंग शास्त्राची हिंदुस्थानांत प्रगति घडून यावी, ह्या दृष्टीनें सर्व इंजिनिअर्सनीं किंमत व मालाची प्रत ह्यांचा विचार न करतां शक्य तोंवर स्वदेशी माल, यंत्रसामुग्री व इतर साधनें ह्यांचा वापर करावा व त्यांस उत्तेजन द्यावें, अशी ह्या सभेची सर्व इंजिनिअर्सना कळकळीची विनंति आहे" असा ठराव मांडला. ह्या ठरावावर भाषणाची आवश्यकताच नाहीं, असें ते म्हणाले. ठरावांतील महत्त्वाच्या शब्दांचा जोर कमी करणाऱ्या कित्येक उपसूचना पुढें आल्या तेव्हां श्री. जोशी ह्यांनीं स्पष्ट शब्दांत आपल्या ठरावाचा खुलासा केला. ते म्हणाले, "मालाच्या चांगुलपणाबरोबरच त्याचा स्वस्तपणा हाही पाहिला पाहिजे हें कोणीही नाकबूल करणार नाहीं. स्वदेशी माल जर चांगल्या प्रतीचा व स्वस्त असेल तर तो न घेणें म्हणजे आपल्या देशाशीं शत्रुत्व दाखविल्या सारखें होईल. हिंदुस्थानांत तयार होणारा माल हा एखाद्या पुढारलेल्या परदेशीय मालाची किंमत आणि चांगुलपणा ह्या बाबतींत बरोबरी करूं शकत नाहीं ही गोष्ट निर्विवाद आहे. परन्तु हा स्वदेशी माल तौलनिक दृष्ट्या थोड्या कमी प्रतीचा व जास्त किंमतीचा असला तरी सुद्धां तो आपण विकत घेतला पाहिजे. एखाद्या विशेष कामासाठी जर एखादें यंत्र घेतलें आणि त्या यंत्राकडून तें काम होत नाहीं तर तें घ्यावें कशासाठी असा कांहीं लोकांचा मुद्दा आहे. असें घडत असेल तर ते यंत्र व नव्हे असें मला वाटतें; अन्य कांहीं पदार्थ असेल!! अर्थात वस्तू विकत घेतांना ही गोष्ट गृहीत धरली आहे कीं ज्यासाठी ती घ्यावयाची ती कमीतकमी अपेक्षा तरी त्याचे कडून पुरी केली गेली पाहिजे.

"किंमत आणि प्रत ह्या दोन गोष्टींचा विचार करणें म्हणजे काय, हें आपणां इंजिनिअर लोकांस बरोबर रीतीनें कळलें पाहिजे. कांहींची कल्पना अशी असते कीं, हिंदुस्थानांत विकण्यांत येणाऱ्या एखाद्या मालाची किंमत म्हणजे त्या मालाच्या उत्पादनाचा खर्च अधिक कांहीं टक्के नफा. या बाबतींत माझें म्हणणें असें आहे कीं, कित्येक वेळां मालाची किंमत ही त्याच्या उत्पादनाच्या खर्चाइतकी असेलच असें नाहीं. ह्यासाठी सरकारी प्रतिवृत्तांतील कांहीं भाग पहाण्यासारखा आहे. हिंदुस्थानच्या रेल्वे खात्यानें प्रसिद्ध केलेल्या श्री. कल्याण- सी. श्रीनिवासन् यांच्या प्रतिवृत्तांत असें म्हटलें आहे कीं "हल्लींच्या आर्थिक परिस्थितींत वस्तूची किंमत ही उत्पादनाच्या खर्चापेक्षां बरीच निराळी असूं शकते. कारण परदेशी हुंडणावळ, सरकारी मदत, संरक्षक जकाती व चढाओढी ह्यांचा त्या किंमतीवर मोठा परिणाम होत असतो."

"ग्रेट ब्रिटनमधील मोठमोठ्या लोकांचीं अर्थशास्त्र व व्यापार या विषयांवरील लेख व भाषणें वाचलीं तर ब्रिटिश माल निर्गत करण्याचा त्या लोकांचा केवढा मोठा प्रयत्न चालू असतो हें आपल्या लक्षांत येईल. माल तयार करणाऱ्या तेथल्या माणसाला एखादा जिन्नस हिंदुस्थानांत आणून ५ रुपयांच्या खाली विकणें परवडत नसेल आणि तो जर ४ रु. सच विकत असेल तर त्या १ रु. ची पडणारी तूट त्याचें सरकार भरून देऊं शकतें. हा रुपया त्याचे सरकारपाशीं कोठून आला? – तर तो इंग्लंडच्या बाजारांत आम्ही जो (कच्चा) माल विकतों त्यापासून मिळालेला असतो. अशा स्थितींत आपल्या देशी कारखानदाराला विदेशी मालाबरोबर चढाओढ कशी करतां येईल? अद्यावत् यंत्रसामुग्री, शेकडों वर्षांचा अनुभव आणि ह्या सर्वांच्या वरची गोष्ट म्हणजे सरकारी पाठबळ त्यांना केवढें मोठें मिळूं शकतें! म्हणून थोडीशी अधिक किंमत देऊन सुद्धां स्वदेशीच माल विकत घ्यावा अशी प्रत्येक जबाबदार इंजिनिअर माणसास विनंति आहे."

"माल विकत घेतांना त्याच्या 'प्रतीकडे' लक्ष न दिलें तर तो माल बनविणारांना, प्रतीचा माल काढण्याची आपण सवलत दिल्यासारखेंच होईल, असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे. परन्तु हा गैरसमजाचा भाग आहे. सद्यःस्थितींत उद्योगधंद्यावर सरकारी नियंत्रण बरेंच परिणामकारक असल्यानें कोणीही मुद्दाम हलक्या प्रतीचाच माल काढणार नाहीं किंवा त्याची "प्रत" सुधारण्यासाठी केलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष करणार नाहीं. अर्थात् हें सरकारी धोरणाच्या नियंत्रणाचें स्वरूप आपणां इंजिनिअर लोकांवर बरेचसें अवलंबून आहे. स्वदेशी माल तयार करणाऱ्या लोकांना तो माल हिंदुस्थानबाहेर कधींच विकावा लागणार नाहीं असें आपण गृहीत धरावें का? त्यांना जर दुसऱ्या देशांत व्यापार करावयाचा असेल तर मालाची प्रत सुधारणें जरूरच आहे. कनिष्ठ प्रतीचा माल काढून फारसा फायदा पडत नाहीं हो गोष्ट सर्व कारखानदारांना माहीत आहे. ज्या प्रमाणांत कार्यक्षमता अधिक त्या प्रमाणांत उत्पादन खर्च कमी आणि विक्रीची किंमत जास्त. व्यवहारी इंजिनिअर लोकांच्या नेहमीच्या अनुभवांतीलच ही गोष्ट आहे.

परिषदेला अखेर श्री. जोशी ह्यांची विचारसरणी मान्य करावी लागली व त्यांचा ठराव मंजूर झाला. श्री. जोशी ह्यांच्या संमतीनें मूळ ठरावांतील कांहीं किरकोळ शब्द बदलून श्री. एन. व्ही. मोडक ह्यांनीं दुसरा ठराव दुसरे दिवशीं मांडला तो सर्वानुमतें मंजूर झाला. "विशिष्ट ज्ञान असणारा हिंदी तज्ञ उपलब्ध नसेल तरच परदेशी इंजिनिअरची नेमणूक करण्यांत यावी. अशा इंजिनिअरच्या नेमणुकीचा करार लहान मुदतीचाच असावा" अशा अर्थाचा श्री. जोशी ह्यांचा दुसरा ठरावहि मंजूर झाला. ह्या ठरावाची अंमलबजावणी करण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी नेमलेल्या समितींत श्री. मोडक, श्री. जोशी व श्री. कागल ह्या इंजिनिअरांचीं नांवें आहेत. इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअर्सच्या बालेकिल्ल्यांत अशा रीतीनें राष्ट्रीय वृत्तीच्या विचारसरणीस चालना देण्याचें अवघड कार्य श्री. जोशी ह्यांनीं चालविलें आहे, त्याकडे वाचकांचें लक्ष वेधणें अगत्याचें आहे.

## प्रचलित आर्थिक व औद्योगिक प्रश्नांवर श्री. डहाणूकर ह्यांचे विचार

### महाराष्ट्र चेंबरच्या सभेंतील भाषण

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स (मुंबई)ची १९ व्या वर्षातील पहिली त्रैमासिक सर्वसाधारण सभा चेंबरचे अध्यक्ष, श्री. महादेव लक्ष्मण डहाणूकर, ह्यांच्या अध्यक्षतेखाली पुणें येथें ता. १४ रोजीं भरली होती. त्यावेळीं अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत प्रथम प्रचलित राजकीय प्रश्नांचा उल्लेख करून शेतकी-सुधारणेची आवश्यकता व अन्नधान्याचा आजचा महत्त्वाचा प्रश्न ह्यांकडे सभासदांचें लक्ष वेधलें. प्रस्तुतची अडचण निवारल्यानंतर, सरकारनें दीर्घकालीन योजना आखून अंमलांत आणणें जरूर आहे असें सांगून, औद्योगिक प्रगती सत्वर घडवून आणण्याची आवश्यकता किती आहे, ह्याचें त्यांनीं विवेचन केलें. त्या संबंधांतील महाराष्ट्रीयांच्या स्थानासंबंधीं ते म्हणाले:—

"महाराष्ट्रीय लोक त्यांना आजवर परिचित असलेले व्यवसाय सोडून हळूहळू व्यापार व उद्योगधंद्यांत पडूं लागले आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. कांहीं महिन्यांपूर्वी पुऱ्या झालेल्या युद्धांत महाराष्ट्रांत हिंदुस्थानच्या इतर भागांशीं तुलना करतां जरी थोडेसेच नवीन उद्योगधंदे निघाले असले तरी माझ्या मतें त्यामुळें निराश होण्याचें कारण नाहीं. पूर्वींच्या ठराविक चाकोऱ्या सोडून, व्यापारउदीमांत पुढें गेलेल्या आपले देशबांधवांचें अनुकरण करून नवीन नवीन क्षेत्रांत महाराष्ट्रीय जाऊं लागले आहेत, ही फार उत्तम गोष्ट आहे."

धंद्याला संरक्षण मिळणें हा प्रश्न महत्त्वाचा नसून, तें वेळींच मिळणें ही गोष्ट मुख्य आहे, ह्या दृष्टीनें टॅरिफ बोर्डाच्या कामाचा उरक झाला पाहिजे, हा श्री. डहाणूकर ह्यांचा मुद्दा महत्त्वाचा आहे. विजेनें चालणाऱ्या आगगाड्यांच्या प्रवासी डब्यांची आयात करण्याच्या सरकारी धोरणाचा त्यांनीं निषेध केला. "आपल्या देशांत रेल्वेचीं इंजनें तयार होणार आहेत, मग आगगाडीचे डबे कां तयार होऊं नयेत?" असा प्रश्न त्यांनीं सरकारला विचारून, हे डबे बाहेरून मागविण्याचीं कारणें सरकारनें प्रसिद्ध केलीं नाहींत ही गोष्ट त्यांनीं स्पष्ट केली.

---

### उसासंबंधीं संशोधन करण्यासाठी १। कोट रुपये

हिंदुस्थान सरकारनें उसासंबंधीं संशोधन करण्यासाठी इंडियन शुगरकेन कमिटीच्या हवालीं १। कोट रुपये केले आहेत.

या रकमेचा उपयोग पुढील चार गोष्टींचें संशोधन करण्यासाठी खर्च करण्याचें कमिटीनें ठरविलें आहे. (१) उसाला लागणारीं योग्य खतें. (२) या कामीं केलेल्या संशोधनाचा उपयोग कसा करावा हें शेतकऱ्यांना समजावून देणारे तज्ञ तयार करणें. (३) उसाच्या पिकाचें रोगराई व जनावरें यापासून संरक्षण करण्यासाठी एक संरक्षक दल व (४) उसाच्या शेतकऱ्यांना जमिनीचा मगदूर कसा वाढवावा हें शिक्षण देण्याची व्यवस्था.

### भारी किंमतीच्या नोटा

११ जानेवारीला भारी किंमतीच्या नोटा बाजारांत १ अब्ज ४३ कोटींच्या होत्या परंतु १२ जानेवारी ते २६ जानेवारीपर्यंत सर्व बँकांत मिळून १ अब्ज १ कोट ७० लाख २० हजार ५०० रुपयांच्याच फक्त बदलून घेण्यांत आल्या असें मध्यवर्ती विधिमंडळांत हिंदुस्थान सरकारच्या अर्थमंत्र्यांनीं सांगितलें.


# दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | | |
|---|---|---|
| खपलेलें भांडवल | : | २,९७,१७,१०० रु. |
| वसूल झालेलें भांडवल | : | १,४८,५८,९५० रु. |
| रिझर्व्ह फंड | : | १,७९,०८,९५० रु. |

मुख्य कचेरी : ओरिएन्टल बिल्डिंग, मुंबई.

—शाखा—

अहमदाबाद
- भद्र (मुख्य ऑफिस)
- एलिस ब्रिज
- स्टेशन ब्रँच
- माणेक चौक

अमृतसर
अंधेरी (मुंबई शेजारीं)
बांद्रे (मुंबई शेजारीं)
भुज (कच्छ)
मुंबई
- बुलियन एक्सचेंज
- कुलाबा
- काळबादेवी
- मलबार हिल

कलकत्ता
- क्लाईव्ह स्ट्रीट (मुख्य ऑफिस)
- बडा बझार
- चौरंगी स्क्वेअर

कोइमतूर
हैद्राबाद (सिंध)
जमशेदपूर
जुनागड
कराची
मद्रास
नागपूर
- किंग्जवे
- इतवारी बझार

पालनपूर
पुणें
पुणें शहर
राजकोट
सुरत
वेरावळ

लंडन एजन्ट्स : दि वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

न्यूयॉर्क एजन्ट्स :—दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

—डायरेक्टर्स—

सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (चेअरमन); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के., नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण; ना. सर शांतिदास आस्करण, केटी; श्री. महंमद सुलेमान कासम मिठा.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

कांहीं ठिकाणें सोडून दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० पेक्षां अधिक शिलकेवरील व्याज फक्त खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं.

कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य दरानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

मृत्युपत्रें व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते आणि ट्रस्टींचें सर्वसाधारण काम स्वीकारते. अर्ज करून नियम मागवावेत.

सर्वसाधारण बँकिंगचा व्यवहार केला जातो.

एच्. ए. करीमभॉय
एजंट



वर्ग पुस्तकें बंद

# मुंबई शेअर बाजार

गोकाक मिल्स १–३–४६ } २१–३–४६ } ( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून ) फिनले मिल्स १६–२–४६ ते ८–३–४६
अपोलो मिल्स १–३–४६ ते २३–३–४६ कोहिनूर मिल्स, सेंट्रल बँक } २२–२–४६ ते १६–३–४६

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार १२।२।४६ | बुधवार १३।२।४६ | गुरुवार १४।२।४६ | शुक्रवार १५।२।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स् | ३० | २७३३–१२ | २७६५—८ | २७७२—९ | |
| ४८०; ३७२ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४८०—८ | ४८५—८ | ४८२—८ | |
| २२२२-८; १७६३-१२ | २५–०–० † | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २१९२—८ | २२०२—८ | २१८३–१२ | |
| ७०२; ५६६ | ९—–० † | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ६५९—० | ६६५—० | ६५८—० | |
| ६६८; ५०७ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ७०३—० | ७०६—० | ७००—० | |
| ४४३–८; ३६० | ९–०–० S | नोव्हें.–एप्रिल | नागपूर | १०० | ४३२—८ | ४३२—८ | ४२५—० | |
| ३४२–०; २७५ | १५–०–० | मार्च | फिनले | १०० | ३३०—० | ३३१—० | ३३०—० | |
| ३३५; २८३-८ | ५–०–० † | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ३३०—० | ३३३—० | ३३०—८ | सार्वजनिक सुट्टी |
| ३३७; २४३ | ४–०–० † | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३२६—० | ३२९—० | ३२५—८ | |
| ५; ३-११-० | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ४–११–६ | ४–११–९ | ४–११–० | |
| १७-१०; १३-७-० | ०–१५–८ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १७—४ | १७—५ | १७—३ | |
| ३-१०; २-९ | ०–३–० | मे | ,, डिफर्ड्स् | १ | ३—६—६ | ३—७—० | ३—६—६ | |
| ७९०; ६४५ | ३५–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७४२—८ | ७५१—४ | ७३८–१२ | |
| २४३–८; २०६-८ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | ११० | २३८—४ | २३७—८ | २३७—० | |
| २५६; २१३-८ | ८–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २४९—८ | २४९—० | २४९—० | |
| ५९२-८; ५१०-० | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६१५—० | ६११—४ | ६१३–१२ | |
| ४३-७; ३०-१२ | ०–४–० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ४३—६ | ४३—० | ४३—६ | |
| | | | ३½% रोखे | १०० | १०३—६ | १०३–६–६ | १०३—६ | |

सोमवार दि. ४–२–४६ पासून बाजार दुपारीं १२ ते १॥ पर्यंत चालू आहे.

### ३% डेव्हलपमेंट लोन

हिंदुस्थान सरकारनें फर्स्ट डेव्हलपमेंट लोनचे, ३% १९७०–७५ चे २० कोटि रुपयांचे कर्जरोखे विक्रीस काढले आहेत.

### व्हाइसरॉयांच्या घरीं अन्नाच्या काटकसरीस प्रारंभ

व्हाइसरॉयांनीं आपल्या स्वतःच्या घरीं अन्नाच्या काटकसरीस आरंभ केला आहे. तांदूळ अजिबात वापरण्यांत येणार नाहीं. संध्याकाळच्या चहाबरोबर पाव किंवा केक दिली जाणार नाहीं. दुपारचे किंवा रात्रींचें जेवण द्यावेळीं टोस्ट, ब्रेड किंवा रोल्स वाढण्यांत येणार नाहींत.

### साखरेचा कोटा कमी होणार

साखरेची परिस्थिति सुधारत आहे व उत्पादन वाढलें आहे व लष्करी मागणी निम्म्यावर आली आहे, त्यामुळें सर्व प्रांतांचा साखरेचा कोटा वाढणार, अशी बातमी डिसेंबर, १९४५ मध्यें प्रसिद्ध झाली. उसाचा पुरेसा पुरवठा होत नसल्यानें साखरेचें उत्पादन घटलें आहे, त्यामुळें साखरेचा कोटा कमी करावा लागेल, अशी ताजी बातमी आहे.

### लढल्याबद्दल निसर्गाची शिक्षा

" निसर्गानें पाऊस आखडता घेऊन पिकांचें उत्पादन मर्यादित केलें आहे. आपण लढण्याचा मूर्खपणा केला, त्याबद्दल निसर्गानें आपणांस केलेलें हें शासन आहे, असें म्हटलें पाहिजे. " :— मि. अर्नेस्ट बेव्हिन, ब्रिटिश परराष्ट्रमंत्री, ह्यांचें संयुक्त राष्ट्रांच्या बैठकींतील भाषण.

### ॲक्चुअरींची परीक्षा

लंडनच्या इन्स्टिट्यूट ऑफ ॲक्चुअरीजची पूर्व परीक्षा २९ व ३० जुलैला होणार आहे. परीक्षेला बसणारांनीं आपले अर्ज व फी हीं लंडनला असिस्टंट सेक्रेटरीकडे २० मे १९४६ च्या आंत खालीलप्रमाणे पाठवावी.

गेल्या वर्षांतील स्पृहणीय यश,

हाच नव्या वर्षाचे कार्याला सुमुहूर्त.

## दि सुप्रीम म्यूच्युअल ॲशुअरन्स कं. लि.

गेल्या वर्षांतील कामाचा आढावा

१. कंपनीकडे आलेले विमाअर्ज रु. १८,८९,००० चे वर

२. कंपनीनें स्वीकारलेले विमाअर्ज रु. १७,८०,००० चे वर

३. पूर्ण झालेलें काम रु. १६,६९,००० चे वर

अल्पावधींत मिळविलेल्या यशाची वरील आंकडेच ग्वाही देतील.

—एजन्सीसाठीं व विम्यासाठीं चौकशी करा—

मॅनेजर,
दि सुप्रीम म्यु. अ. कं. लि.

हेड ऑफिस:—
८६६ सदाशिव पेठ, पुणें नं. २

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड मेडॅलिस्ट व मराठी पळणाचे स्पेशॅलिस्ट
## पेन्टर बेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

---

## १९४४ मधील प्रगति
—तुलनात्मक आंकडे—
१९४३ सालीं पूर्ण झालेलें काम ८,००,००० रु. वर
१९४४ सालीं पूर्ण झालेलें काम ११,००,००० रु. वर
विमा हप्त्यांचें उत्पन्न १९४४ सालीं १,८३,००० रुपयांचे वर झालें. खर्चाचें प्रमाण उतरलें आहे व त्या प्रमाणांत लाइफ फंडांत वाढ झाली आहे.
## दि ट्रस्ट ऑफ इंडिया
ॲशुअरन्स कं. लि. पुणें.
मॅनेजर, व्ही. एच. देशमुख, बी. ए. — अध्यक्षः—श्री. सरदार जगन्नाथमहाराज पंडित

---

## सन १९४५ मधील प्रगति
नवें काम ७,००,००० रु.
चालू काम १०,००,००० रु.
१९४५ मधील हप्त्यांचें उत्पन्न सुमारें १,००,००० रु.
खर्चाचें प्रमाण फक्त ११%
— आपला विमा किंवा एजन्सी आजच द्या —
## दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट — व्ही. जी. ओगशी, मॅनेजिंग डायरेक्टर

---

## पैसा आणि ज्ञान वाढवा !
श्रीमंत कसें व्हावें !—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक ! हें भाग्यवर्धक पुस्तक हजारों रु. मिळवून देईल ! किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापार उद्योगधंद्यांत नक्की यश कसें मिळवावें तें शिकवितें. किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक काम सौख्याचें सुंदर विवेचन करतें. किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्भुत कथानक ! किं. १ रु.
—आजच लिहा—
मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो. कराड, जि. सातारा.


---

ओलक ] फाफ मशिनच्या तोडीचीं [ ओलक
## ओलक शिवण्याचीं यंत्रें
रोखीनें अगर हप्त्यानें मिळतात.
लिहा अगर भेटाः—व्ही. आर. बापट,
ओलक मशिन कं., लकडी पुलाजवळ,
लक्ष्मीरोड, पुणें नं. २

---

## बिनचूकच्या माहितीनें
मोजक्या प्राप्तींत वाढत्या संसारखर्चास सहज आळा घालतां येतो
प्रत्यक्ष माहिती मोफत —— किंमत ४ आणे
—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पुल, मुंबई नं. २७.
—— : स्टॉकिस्ट पाहिजेत : ——

---

## पेडणेकर आणि कंपनी लि.,

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २७३८२

---

## दी आयुर्वेदीय अर्कशाला
लिमिटेड, सातारा.
लोहिन:—रक्तवर्धन करणारें औषध. ॲनिमिया व आजारानंतर येणारी अगर इतर कोणतेही कारणानें येणारी क्षीणता फारच जलद नष्ट केली जाते.
१ कोल्हापूर केंद्रः—गुजरी कोल्हापूर, २ हुबळी केंद्रः—मराठ गल्ली, हुबळी, ३ मुंबई केंद्रः—२१८ केळेवाडी, गिरगांव रोड, मुंबई.

---

## इनकॅंडीसंट लॅंप्स मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, लिमिटेड
३७६ शुक्रवार, पुणें २
सरकारी सप्लाय खात्याची मॅंटल बत्त्यांची मोठी ऑर्डर पुरी करण्याचें कार्य चालू आहे.
नवीन शेअर विक्रीस सरकारी मान्यता मिळाली असून विक्री सुरू आहे.
ठेवी स्वीकारल्या जातात
दराबद्दल चौकशी करा
पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ८२३, शिवाजी नगर, ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.